महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १३ सप्टेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक - ०८१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत ०२ रुपये

# आयोवा-महाराष्ट्र भागीदारी

## विकास व समृद्धीचे नवे पर्व! – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



- गुंतवणूक व आर्थिक देवाणघेवाण वृद्धिंगत होणार
- शेती, अन्नप्रक्रिया, आरोग्य, पर्यटन, क्रीडा, अक्षय ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढेल
- विद्यापीठे व संशोधन केंद्रांमध्ये शैक्षणिक सुविधा मिळणार

**महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमेरिकेतील आयोवा राज्याच्या गव्हर्नर किम रेनॉल्ड्स यांनी 'महाराष्ट्र सरकार आणि अमेरिकेतील आयोवा राज्य' यांच्यातील ऐतिहासिक सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या भागीदारीचा उद्देश माहिती आणि अनुभवाची देवाणघेवाण करणे हा असून हा सामंजस्य करार दोन्ही राज्यांमध्ये सहकार्य आणि भागीदारीचा नवा अध्याय रचेल!**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई:** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज सह्याद्री अतिथिगृहावर १ लाख ८ हजार ५९९ कोटी रुपयांच्या पाच सामंजस्य करारावर स्वाक्षरी करण्यात आली. डेटा सेंटर, पॉलिमर उत्पादने, कोल गॅसिफिकेशन क्षेत्रातील या उद्योगांतून सुमारे ४७ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. राज्यात गणेशोत्सवाच्या मुहूर्तावर ३४ हजार कोटींच्या गुंतवणुकीचे करार करण्यात आले होते. मागील पंधरा दिवसांत आज दुसऱ्यांदा मोठी गुंतवणूक झाली आहे. ही गुंतवणूक कोकण, नाशिक व विदर्भ विभागांत होणार आहे.

आज झालेल्या करारात सर्वांत मोठी गुंतवणूक ही 'अदानी इंटरप्रायजेस' यांच्याकडून करण्यात येणार आहे. लिंगा , कमलेश्वर (नागपूर) येथे अदानी समूहाकडून ७० हजार कोटींचा कोल गॅसिफिकेशन व आनुषंगिक उत्पादने निर्मिती प्रकल्प उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे ३० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याचे उद्योग विभागाकडून सांगण्यात आले. काटोल (नागपूर) येथे रिलायन्स कंझ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड यांच्याकडून १ हजार ५१३ कोटी रुपये गुंतवणुकीचा अन्नपदार्थ प्रकल्प उभारला जाणार आहे. मे. लोढा डेव्हलपर्स लिमिटेड यांच्याकडून अंबरनाथ, ठाणे येथे हरित एकात्मिक डेटा सेंटर उभारले जाणार आहे. त्यासाठी ३० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. या प्रकल्पात सहा हजार लोकांना रोजगार मिळणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

यावेळी मुख्य सचिव राजेश कुमार, अतिरिक्त मुख्य सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अनगलबन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासू, मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार (गुंतवणूक व धोरण) कौस्तुभ धवसे, उद्योग विभागाचे सहसचिव डॉ. श्रीकांत कुलकुंडवार उपस्थित होते.

## उद्योग गुंतवणुकीसाठी महाराष्ट्र सर्वोत्तम'

राज्य सरकार विविध क्षेत्रांविषयी नवीन धोरण आखत आहे. येत्या काळात १४ क्षेत्रांसाठीची धोरणे जाहीर होणार आहेत. महाराष्ट्र हे देशातील एक उद्योगस्नेही राज्य असून उद्योग आणि गुंतवणुकीसाठी सर्वोत्तम आहे. राज्यात गुंतवणूक आणि उद्योगांसाठी पोषक वातावरण निर्माण झाले आहे," असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

'जियो वर्ल्ड ट्रेड सेंटर' येथे 'इंडिया ऑस्ट्रेलिया बिझनेस अँड कम्युनिटी अलायन्स (आयएबीसीए) ग्लोबल फोरम लिडर्स मिट' आणि 'सीईओं'सोबत झालेल्या राउंडटेबल कॉन्फरन्स वेळी ते बोलत होते.

मुख्यमंत्री म्हणाले की, " उद्योजकांना गुंतवणूकदारांना अडचणी येऊ नयेत यासाठी सर्व परवानग्या लवकर प्राप्त करता याव्यात या उद्देशाने मैत्री पोर्टल निर्माण करण्यात आले आहे." ऑस्ट्रेलिया हा शिक्षण क्षेत्रातील एक अग्रगण्य देश आहे. आता हेच शिक्षण नवी मुंबई येथील 'एज्युसिटी' मध्ये मिळणार आहे. तसेच गोंडवाना विद्यापीठाशी कुर्निल विद्यापीठाने केलेल्या करारामुळे खाणकाम तंत्रज्ञानाचे शिक्षण उपलब्ध होऊन त्याचा फायदा गडचिरोलीत लोह उद्योगाला होईल.

लक्षवेधी

## भिवंडीत बोगस डॉक्टरांवर गुन्हे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १२ (वार्ताहर) :** झोपडपट्टी विभागातील गरीब व अशिक्षित नागरिकांच्या असहाय्यतेचा फायदा घेत अनेक बोगस डॉक्टरांनी आपले दवाखाने थाटले आहेत. याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्याने आयुक्त अनमोल सागर यांनी पालिका हद्दीतील तीन बोगस डॉक्टरांविरोधात गुन्हा दाखल करण्याचे निर्देश आहे. पालिकेचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप गाडेकर, बोगस डॉक्टरांवर कारवाई करणाऱ्या पथकाचे नियंत्रण अधिकारी डॉ. जयवंत धुळे यांच्या मार्गदर्शनाखाली वैद्यकीय पथकाने पोलिसांसह केलेल्या कारवाईत नागाव परिसरातील ज्योत्स्नानगर येथील भक्तीसागर इमारत येथील कारवाईत भीमराव ग्यानबा कावडे, शांतिनगर परिसरातील आझाद नगर येथील सिद्धीकी क्लिनिकचे मोहम्मद शमीम सिद्धीकी, गायत्रीनगर परिसरातील नूरी नगर डोंगरपाडा येथे मोहम्मद अयुब मोहम्मद हानीफ या बोगस डॉक्टरांवर कारवाई करण्यात आली.

## जिल्हा परिषदेच्या 'डोअर स्टेप डिलिव्हरी' उपक्रमांतर्गत साडेतीन हजार अर्जदारांना सेवा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** सामान्य नागरिकांना सरकारी सेवा त्यांच्या दारातच सहज, सुलभ आणि जलदगतीने उपलब्ध व्हाव्यात, यासाठी ठाणे जिल्हा परिषदेने एक क्रांतिकारी पाऊल उचलले आहे. 'डोअर स्टेप डिलिव्हरी' या अभिनव उपक्रमामुळे जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांना घरबसल्या शासनाच्या विविध सेवा मिळत आहेत. ठाणे जिल्हा परिषदेच्या डोअर स्टेप डिलिव्हरी उपक्रमांतर्गत ३ हजार ६५९ अर्जदारांना घरबसल्या शासकीय सेवा पुरविण्यात आल्या आहेत. ८० विभागांच्या ४०२ सेवांचा लाभ जिल्ह्यातील ४३१ ग्रामपंचायतींच्या माध्यमातून नागरिकांना घरपोच मिळतो आहे.

हा उपक्रम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविला जात असून, आतापर्यंत एकूण ४ हजार १३ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी ३ हजार ६५९ अर्ज पूर्ण झाले असून, उर्वरित १७० अर्जांवर काम सुरू असल्याची माहिती उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी दिली. तिकीट आरक्षण, शाळा व परदेशी शिष्यवृत्ती, शासकीय वसतिगृह प्रवेश, अर्थसहाय्य, नवीन कौटुंबिक शिधापत्रिका, महाभरती व नोकरी नोंदणी. महसूल, पोलीस व जिल्हा कार्यालयाशी संबंधित सेवाही या उपक्रमांतर्गत घरपोच उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

## राज्यातील जिल्हा परिषद अध्यक्षपदांचे आरक्षण जाहीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील 34 जिल्हा परिषदांच्या अध्यक्षपदांसाठी आरक्षणाची यादी आज जाहीर करण्यात आली. विविध प्रवर्गांनुसार ठरविण्यात आलेल्या या आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सत्तासमीकरणावर मोठा प्रभाव पडणार आहे. जाहीर यादीनुसार, ठाणे, पुणे, रायगड, सिंधुदुर्ग, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, बुलढाणा, यवतमाळ यांसह नागपूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदांसाठी सर्वसाधारण प्रवर्ग खुला ठेवण्यात आला आहे. यामध्ये ठाणे, सांगली, कोल्हापूर, लातूर, अमरावती, गोंदिया, गडचिरोली यांसारख्या जिल्ह्यांत सर्वसाधारण (महिला) आरक्षण लागू करण्यात आले आहे. अनुसूचित जातीसाठी बीड (महिला), हिंगोली, परभणी, वर्धा आणि चंद्रपूर (महिला) ही पदे आरक्षित करण्यात आली आहेत. तर अनुसूचित जमातीसाठी पालघर, नंदुरबार, अहिल्यानगर (महिला), अकोला (महिला) आणि वाशिम (महिला) या जिल्ह्यांतील अध्यक्षपदे राखीव ठेवली गेली आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्ग (OBC) साठी रत्नागिरी (महिला), धुळे (महिला), सातारा (महिला), सोलापूर, जालना (महिला), नांदेड, धाराशिव (महिला), नागपूर आणि भंडारा या जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला आहे.

या आरक्षण घोषणेमुळे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांतील राजकीय गणिते ठरविण्यात महत्त्वाचा बदल होणार आहे. पक्षीय स्तरावर उमेदवार ठरविताना या आरक्षणाचा विचार करावा लागणार असून, महिला आरक्षणामुळे अनेक जिल्ह्यांत नवीन नेतृत्वाला संधी मिळणार आहे.

## सेंच्युरी कंपनीच्या कँटीनमध्ये बनावट कूपन घोटाळा?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगरच्या औद्योगिक क्षेत्रातील सेंच्युरी कंपनीत कामगारांसाठी दिल्या जाणाऱ्या कूपनच्या नावाखाली लाखोंच्या घोटाळ्याची उघडकी आली आहे. कँटीनशी संबंधित कर्मचारी, दलाल आणि जवळच्या प्रिंटिंग प्रेसच्या मालकाने मिळून नकली कूपन छापले होते. कंपनीत कामगारांना नाश्ता, चहा आणि पाव यासाठी अनुक्रमे चार, तीन आणि दोन रुपयांचे कूपन दिले जातात. ही साधी योजना काही भ्रष्ट मंडळींसाठी सोन्याची खाण ठरली, कारण त्यांनी मूळ कूपनाची हुबेहूब नक्कल करून हजारो बनावट कूपन छापले. या बनावट कूपनांचा वापर करून कँटीनमधून मोठ्या प्रमाणावर खाद्यपदार्थ घेऊन लाखोंची आर्थिक हेराफेरी केली गेली. घोटाळा मूळ प्रिंटर संचालकाच्या जागरूकतेमुळे उघड झाला. त्याने तातडीने कंपनी व्यवस्थापनाला माहिती दिली. त्यानंतर पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष आव्हाड यांच्या पथकाने तपास सुरू केला. कारवाई दरम्यान प्रिंटिंग प्रेसवर धाड टाकून छपाईसाठी वापरलेली यंत्रणा आणि तब्बल ७८ हजार रुपयांच्या जाली कूपनचा साठा जप्त करण्यात आला.



## ठाणेकरांच्या पर्यावरणपूरक गारेगार प्रवासाला महिनाभराची प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**ठाणे :** ठाणेकरांच्या गारेगार व पर्यावरणपूरक प्रवासाच्या आशा आणखी काहीकाळ लांबल्या आहेत. पंतप्रधान इलेक्ट्रिक बस योजनेंतर्गत ठाणे परिवहन सेवेला मिळणाऱ्या पहिल्या टप्प्यातील २५ इलेक्ट्रिक बसेस तांत्रिक अडचणींमुळे अद्याप प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे या बसेस दाखल होण्यासाठी किमान महिनाभराचा विलंब होणार असल्याची माहिती समोर आली आहे.

ठाण्यातील वाढती लोकसंख्या आणि जुन्या, नादुरुस्त टीएमटी बसगाड्यांमुळे सार्वजनिक वाहतुकीवर नेहमीच टीका होत असते. नागरिकांचा प्रवास सुखकर आणि प्रदूषणविरहित करण्यासाठी महापालिकेने इलेक्ट्रिक बसेस खरेदीचा निर्णय घेतला.

पंतप्रधान इलेक्ट्रिक बस योजनेतून ठाणे परिवहनला एकूण १०० नवीन बस मिळणार आहेत. यामध्ये ९ मीटर लांबीच्या ६० आणि १२ मीटर लांबीच्या ४० वातानुकूलित बसचा समावेश आहे. या बसेस मार्च अखेरीपर्यंत दाखल होणे अपेक्षित होते; मात्र आधी जुलैपर्यंत आणि आता पुन्हा तांत्रिक अडचणींमुळे त्यात विलंब झाला आहे. सध्या या बसेसची तांत्रिक दुरुस्ती व पुन्हा परीक्षणाचे काम सुरू असून, ते पूर्ण झाल्यानंतरच त्या ठाणे परिवहनच्या ताफ्यात दाखल होतील. या विलंबामुळे नागरिकांमध्ये नाराजी असून, सुधारित आणि पर्यावरणस्नेही बससेवेची प्रतीक्षा ठाणेकरांना अद्याप कायम राहणार आहे.






# नैसर्गिक शेती स्टेकहोल्डर सभेसाठी शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून पत्रकारांना मान




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : डॉ बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ,अंतर्गत प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत जि रायगड डॉ ए पी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित अखिल भारतीय समन्वित एकात्मिक कृषि पध्दती प्रकल्प, अखिल भारतीय समन्वित नैसर्गिक शेती कार्यक्रमात नैसर्गिक शेतीसंबधीत मसुदा तयार करणेबाबत अंत्यत महत्त्वाच्या 'स्टेकहोल्डर, सभेसाठी कल्याण तालुक्यातील शेती मित्र पत्रकार संजय कांबळे यांना शेतकऱ्यांचे प्रतिनिधी म्हणून निमंत्रित करण्यात आले होते, त्यांच्या समवेत राज्यपाल पुरस्कार प्राप्त शेतकरी श्रीराम पालवी हेही उपस्थित होते.

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र कर्जत जि रायगड येथील सभागृहात या स्टेकहोल्डर सभेचे आयोजन करण्यात आले होते, याकरिता डॉ बी डी वाघमोडे, सहयोगी संचालक संशोधन केंद्र कर्जत, श्रीमती वंदना शिंदे, जिल्हा अधिक्षक, कृषि अधिकारी, रायगड, डॉ एन व्ही म्हसकर, डॉ व्ही व्ही सावंत, किटक शास्त्रज्ञ, डॉ ए पी चव्हाण, दापोली, डॉ आर जी मर्दाने, शिक्षण शास्त्रज्ञ, तसेच कृषि क्षेत्रात नावलौकिक मिळवलेले अनेक पुरस्कार प्राप्त नरेश सावे, कोसबाड, राजेंद्र भट, बदलापूर, संतोष दिवकर, रोहा, इत्यादीनी शेतकऱ्यांना नैसर्गिक शेती बाबतीत सखोल मार्गदर्शन केले,


ठाणे जिल्ह्यातून श्रीमती वैशाली बापसे, तालुका तंत्रज्ञ,शेतीनिष्ठ पुरस्कार मिळालेले श्रीराम पालवी, कृषी सखी कविता पारधी, पूजा धुमाळ, शहापूरचे,शेतकरी मिलिंद बसवंत, गजानन उमवणे, मनोहर उमवणे, आणि पत्रकार संजय कांबळे हे सहभागी झाले होते, यावेळी शेतकऱ्यांनी विविध प्रश्न, अडचणी, समस्या, कृषि तज्ञांना विचारल्या, यानंतर काही शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीचे प्लॉटची पाहणी केली.

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ एन व्ही म्हसकर यांनी केले.

# ज्ञानेश्वरी जयंती

## ज्ञानेश्वरीचे मूळ नाव माहितीय का?

प.पु. स्वामी गोविंद देवगिरी महाराजांनी अलीकडेच एका कार्यक्रमात ज्ञानेश्वरी बाबत खुलासा केला आहे, जो भागवत धर्मातील अनेक भाविकांना परिचायाचा असेलही! मात्र सर्वसामान्य लोकांच्या ज्ञानात भर पडावी म्हणून १३ सप्टेंबर, ज्ञानेश्वर जयंतीचे औचित्य साधून 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथांच्या मूळ नावाबद्दल जाणून घेऊ.




संत ज्ञानेश्वरांनी लिहिली म्हणून ती ज्ञानेश्वरी, असा जर तुमचा आजवरचा समज असेल तर तुम्ही चुकताय! कारण, ज्ञानेश्वरांनी आपल्या ग्रंथाला कधीही ज्ञानेश्वरी म्हटले नाही की ज्ञानदेवी म्हटले नाही, तर त्यांनी आपल्या ग्रंथाला नाव दिले होते - भावार्थदीपिका! श्रीकृष्णाने भगवद्गीतेत जसे सांगितले, तसे अनुवादन ज्ञानेश्वरांनी या ग्रंथात केले आहे. हा भावार्थ दीपाप्रमाणे आपले आयुष्य उजळून टाकणारा आहे.

१३ सप्टेंबर रोजी भाद्रपद कृष्ण षष्ठी आहे, ही तिथी श्री ज्ञानेश्वरी जयंती(Dnyaneshwari Jayanti 2025) म्हणून ओळखली जाते. भगवान श्री ज्ञानेश्वर माउलींनी शके १२१२ अर्थात् इ. स.१२९०-९१ मध्ये श्रीक्षेत्र नेवासे येथील श्रीमोहिनीराजाच्या मंदिरात श्री ज्ञानेश्वरी प्रथम सांगितली. पण ती कोणत्या तिथीला लिहायला सुरवात केली व कोणत्या तिथीला पूर्ण केली हे इतिहासाला ज्ञात नाही. ज्ञानेश्वरीमध्ये भाग्वद्गितेचे सार सोप्या शब्दात आणि उदाहरणांसह विस्तृत करून संगितले आहे. म्हणून संत नामदेव म्हणतात, 'एक तरी ओवी अनुभवावी!' म्हणजेच, केवळ वाचून विसरून जाऊ नका तर त्याचं चिंतन करा, अनुभूति घ्या अस ते सांगताहेत. नामदेवांनी या ग्रंथाचा उल्लेख ज्ञानदेवी केला आहे, मग ज्ञानेश्वरी हा शब्द आला कुठून? तर....

महिला संत आणि नामदेवांची शिष्या जनाबाई यांनी भावार्थदीपिकेला 'ज्ञानेश्वरी' संबोधून या ग्रंथाचा गौरव केला. हा शब्द एवढा रूढ झाला की आता कोणीही भाविक भावार्थदीपिका असे न संबोधता ज्ञानेश्वरी असेच म्हणतात आणि भाद्रपद कृष्ण षष्ठीचा दिवस भावार्थदीपिका जयंती म्हणून साजरा न करता 'ज्ञानेश्वरी जयंती' म्हणून साजरा करतात. ग्रंथांचीही जयंती साजरी करणारी आपली दिव्य संस्कृती खरोखरीच महान म्हटली पाहिजे, बरोबर ना?

# सी.पी. राधाकृष्णन यांचा भारताचे १५ वे उपराष्ट्रपती म्हणून शपथविधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशाचे 15 वे उपराष्ट्रपती म्हणून सी.पी. राधाकृष्णन यांना आज राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडपम येथे पदाची आणि गोपनीयतेची शपथ दिली.

या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती भूषण गवई, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद, माजी उपराष्ट्रपती जयदीप धनखड अनेक केंद्रीय मंत्री,महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ,विधानसभाचे अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, राजकीय नेते, उच्चपदस्थ अधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. उपराष्ट्रपती म्हणून श्री राधाकृष्णन हे राज्यसभेचे पदसिद्ध अध्यक्ष आहेत.

# भिवंडीतील अनधिकृत बांधकामांवर पालिकेचा हातोडा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : दिनांक 29/07/2025 रोजी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर, (भा.प्र.से.) यांनी प्रभाग समिती क्र. 1 ते 5 मध्ये कार्यरत बिट निरीक्षक तथा सहा. पदनिर्देशित अधिकारी यांनी आढावा बैठक घेतली होती. सदर बैठकीमध्ये प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी मनपा हद्दीत होत असलेल्या अनधिकृत बांधकामांसंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करून मा. मुंबई उच्च न्यायालयातील सुमोटो याचिका क्र. 01/2020 मध्ये दिनांक 26/02/2022 रोजीच्या न्यायनिर्णयाचे काटेकोरपणे पालन करून, अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाईचे निर्देश संबंधितांना दिले. सन 2022 पासूनच्या एकूण 291 अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले होते. तसेच यापुढे कोणतेही अनधिकृत बांधकाम होणार नाही तसेच सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामे तातडीने थांबवून त्यावर निष्कासनाची कारवाई करणेबाबतची दक्षता पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी घ्यावी अन्यथा संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल अशी स्पष्ट ताकीद आयुक्तांनी दिली होती.त्यानुषंगाने मा. अतिरीक्त आयुक्त श्री. विठ्ठल डाके व उपायुक्त (अन. बांधकाम) श्री. विक्रम दराडे यांचे मार्गदर्शनाखाली खालील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यात आली.



प्रभाग समिती क्र. 1 चे सहायक आयुक्त श्री. मकसुम शेख यांनी आज दि. 12/09/2025 रोजी मालमत्ता क्र. 1901/0, शांतीनगर, नागाव-2 या अनाधिकृत बांधकामावर...

प्रभाग समिती क्र. 3 चे सहायक आयुक्त श्री. सुरेंद्र भोईर यांनी दि. 11/09/2025 रोजी मौजे नवीन कणेरी शास्त्रीनगर येथील सर्वे नंबर 27, 28, 29, 30 या जागेवर झालेले अनधिकृत बांधकाम (सुमोटो प्रकरण केस क्र. 1/2020 नुसार) वर आणि आज दिनांक 12/09/2025 रोजी मौजे नवीन कणेरी येथील घर नंबर 604/2 वर...प्रभाग समिती क्र. 4 चे सहायक आयुक्त श्री. गिरीष घोष्टेकर यांनी आज दि. 12/09/2025 रोजी दिवाणशाह दर्गा रोड, दुधबावडी येथील घर नं. 313 नविन गौरी पाडा या अनाधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई केली. यापुढे देखील प्रभागातील अनधिकृत बांधकामांवर कारवाई सुरू राहणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले आहे.

# महावितरणला हायब्रीड वीज प्रकल्पाची 'पॉवर'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्याच्या कानाकोपऱ्यात वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणला आता हायब्रीड वीज प्रकल्पाची 'पॉवर' मिळणार आहे. महावितरणने एनटीपीसीच्या सौर-पवन अशा एकत्रित हायब्रीड वीज प्रकल्पातून वीज खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे दाखल केला होता. त्याची दखल घेत आयोगाने सादर वीज प्रकल्पातून वीज घेण्यास ग्रीन सिग्नल दाखवला आहे. या प्रकल्पात तयार होणारी वीज प्रतियुनिट सुमारे साडेतीन रुपयांना मिळणार आहे.

महावितरणकडून राज्यभरात दररोज कमाल २७ हजार मेगावॅट वीज वितरित केली जाते. वीज नियामक आयोगाने हरित ऊर्जा प्रोत्साहन देण्यासाठी सर्वच वीज वितरण कंपन्यांना त्यांच्या एकूण वीज वितरणाच्या सुमारे १४-१८ टक्के वीज हरित ऊर्जा म्हणजे सौर, पवन, लघु जलविद्युत प्रकल्पातून खरेदी करणे बंधनकारक केले आहे. त्यानुसार महावितरणने एनटीपीसीच्या ४८० आणि ३०० अशा सौर-पवन (हायब्रीड) वीज प्रकल्पातून दीर्घकालीन वीज खरेदी कराराद्वारे वीज घेण्याबाबत आयोगाकडे याचिका दाखल केली होती. त्यानुसार आयोगाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे हायब्रीड वीज प्रकल्पातून वीज खरेदी करण्याचा महावितरणचा मार्ग मोकळा झाला आहे. महावितरणला सध्या कोळशावरील औष्णिक वीज प्रकल्पातून सुमारे चार रुपये प्रतियुनिट दराने वीज खरेदी करावी लागत आहे; मात्र हायब्रीड वीज प्रकल्पातून मिळणारी वीज सुमारे ३.४२ रुपये आणि ३.४३ रुपये प्रतियुनिट एवढ्या कमी दराने मिळणार आहे. त्यामुळे त्याचा महावितरणला म्हणजे वीजग्राहकांना भविष्यात थेट फायदा होऊ शकणार आहे.

# उबाठा गटातील कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : आज रोजी उबाठा गटातील बहुसंख्य कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. चांबले ग्रामपंचायतीच्या विद्यमान उपसरपंच गीता गजानन भोईर यांनी आपल्या सर्व सदस्यांसहित भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. पक्षाच्या कामकाजावर नाराजी व्यक्त करत हा प्रवेश केल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले.

माजी तालुकाध्यक्ष मंगेश पाटील यांच्या माध्यमातून पालघर लोकसभा खासदार डॉ. हेमंत सवरा, ज्येष्ठ नेते बाबाची काठोळे यांच्या उपस्थितीत पक्षाच्या तालुका कार्यालयात हा प्रवेश सोहळा पार पडला. ह्या प्रवेशामुळे वाडा तालुका व कुडूस विभागामध्ये भारतीय जनता पार्टीची ताकद वाढली असून पक्षात आनंदाचे वातावरण आहे.

# ढिसाळ शिक्षण व्यवस्थेविरोधात सोनावळे ग्रामस्थांचे आंदोलन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील सोनावळे येथील जिल्हापरिषदेच्या शाळेत शिक्षक नसल्याने ग्रामस्थांनी गुरवार 11सप्टेंबर रोजी एक दिवशीय धरणे आंदोलन करून प्रशासनाचा निषेध केला.



जिल्हा परिषद केंद्रशाळा सोनावळे येथे सर्व पालक व ग्रामस्थ यांच्या वतीने मुरबाड तालुक्यातील ठिसाळ शिक्षण व्यवस्थेविरोधात धरणे आंदोलन करण्यात आले,सदर आंदोलनातील प्रमुख मागण्या अशा आहेत. अपुरी शिक्षण व्यवस्था पुर्ण करून देणे,मागील चार महिन्यांपासून रजेवर असलेल्या शिक्षिका तात्काळ हजर करून घेणे,नवीन रुजू झालेले शिक्षक शारिरीक व्याधीमुळे अध्यापनाचे कार्य करू शकत नसल्याने पर्यायी व्यवस्था करावी अशा अनेक मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.तरी तातडीने वरील मागण्या मान्य न झाल्यास पंचायत समिती मुरबाड कार्यालयासमोर पालकांच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे सोनावळे ग्रामस्थांनी सांगितले आहे. या आंदोलनाची दखल घेत गटविकास अधिकारी डॉ. लता गायकवाड यांनी तातडीने काशिनाथ भोईर या शिक्षकाची नेमणूक करण्यात आल्याचे पत्र ग्रामस्थांना यावेळी दिले आहे.

# जिल्ह्यातील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना जवाहर नवोदय विद्यालयात सुवर्णसंधी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : पीएम श्री स्कूल जवाहर नवोदय विद्यालय, निजामपूर, तालुका माणगाव , जिल्हा रायगडच्या सत्र 2026-2027 करिता इयत्ता अकरावी (विज्ञान शाखा) निवड परीक्षेचे ऑनलाईन अर्ज https://cbseitms.nic.in/2025/nvsxi_11 या संकेतस्थळावर सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ऑनलाइन अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 23 सप्टेंबर 2025 पर्यंत आहे. परीक्षा दि. 07 फेब्रुवारी 2026 रोजी जवाहर नवोदय विद्यालय निजामपूर येथे होणार आहे. रायगड जिल्ह्यातील सर्व परीक्षार्थी, पालक, सर्व शिक्षक व मुख्याध्यापक यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन डॉ. प्रशांत राघमवार प्राचार्य ,जवाहर नवोदय विद्यालय, रायगड यांनी केले आहे.


अधिक माहितीसाठी शारदा अहिरे -7020614069, श्रीमती रश्मी मिश्रा -9011738040, श्री=संतोष चिंचकर मो.9881351601 या मोबाईल क्रमांक वर संपर्क साधावा.

आरोग्य

# डोळे सुंदर आणि टवटवीत दिसण्यासाठी सोपे उपाय

१. सर्वप्रथम डोळ्यांना पुरेशी विश्रांती देणे आवश्यक आहे. पुरेशी झोप घेतली नाही तर डोळ्यांखाली काळी वर्तुळे आणि थकवा स्पष्ट दिसतो. त्यासाठी रात्री किमान सात ते आठ तासांची झोप गरजेची ठरते. डोळ्यांना थंडावा देण्यासाठी गुलाबपाणी, काकडीचे तुकडे किंवा थंड दुधात बुडवलेले कापसाचे बोळे ठेवले तर थकवा आणि सूज कमी होण्यास मदत होते.

२. काजळ हा केवळ शोभेचा भाग नसून डोळ्यांसाठी फायदेशीर असलेली गोष्ट आहे. स्वच्छ आणि नैसर्गिक काजळ डोळ्यांना थंडावा देतो तसेच डोळ्यांतील घाण बाहेर काढण्यास मदत करतो. नियमितपणे काजळ लावल्याने



डोळ्यांची चमक वाढते आणि ते स्वच्छ राहतात. मात्र बाजारातील रसायनयुक्त काजळ वापरण्यापेक्षा घरी बनवलेले नैसर्गिक काजळ वापरल्यास डोळ्यांचे आरोग्य अधिक चांगले राहते.

३. डोळ्यांवर ताण येऊ नये म्हणून दिवसातून काही वेळ डोळ्यांचे व्यायाम करणे उपयोगी ठरते. डोळे फिरवणे, पापण्या मिटून हलके दाब देणे किंवा काही सेकंद दूरच्या हिरवळीकडे लक्ष केंद्रित करणे हे व्यायाम डोळ्यांना विश्रांती देतात.

४. पाणी पुरेशा प्रमाणात प्यायल्याने डोळ्यांचा कोरडेपणा कमी होतो आणि डोळे अधिक ताजेतवाने दिसतात. संगणक किंवा मोबाइलवर काम करताना दर काही वेळाने डोळ्यांना विश्रांती देणेही गरजेचे आहे.

५. सुंदर डोळ्यांसाठी आणि स्पष्ट दिसण्यासाठी फक्त बाहेरून काळजी घेणे पुरेसे नाही, तर शरीराला आवश्यक पोषण मिळाले पाहिजे. जीवनसत्त्व 'ए' आणि 'ई' युक्त आहार डोळ्यांच्या आरोग्यासाठी महत्त्वाचा आहे. गाजर, पालक, बदाम, आणि हिरव्या भाज्या खाल्ल्यास डोळ्यांचे तेज वाढते. त्यामुळे हे काही उपाय नियमित केल्याने फायदा नक्की जाणवेल.

# पेण येथील श्री सदस्यांनी केले सात टन निर्माल्य गोळा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : डॉ. श्री .नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या वतीने पेण शहरासह पेण तालुक्यातील गणेश विसर्जन ठिकाणाहून ७ टन निर्माल्य गोळा करण्यात आले असून या निर्माल्य पासून खत निर्मिती केली जाणार आहे .

रेवदंडा येथील डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे वृक्षारोपण व संगोपन,स्वच्छता अभियान,आरोग्य तपासणी शिबीर,प्रौढ साक्षरता वर्ग, तलावातील गाळ काढणे, विहीर पुनर्भरण आदी विविध सामाजिक कार्य केले जात आहेत.या बरोबरच गणेश विसर्जन वेळी निर्माल्य तलाव अथवा नदीत सोडण्यात येत असल्यामुळे होत असलेल्या पाणी प्रदूषण टाळण्यासाठी प्रतिष्ठानच्या वतीने गणेश विसर्जन वेळी निर्माल्य गोळा करुन त्याच्यापासून खत निर्मिती करण्याचा उपक्रम देखील मागील काही वर्षांपासून हाती घेण्यात आला आहे.



या वर्षी पेण शहर व तालुक्यातील दीड दिवसांचे १९७६ ,पाच दिवसांचे ४१०४ व श्री गौरी मूर्ती ७०५ तर अनंत चतुर्दशी दिवशी ८४४ विसर्जन करण्यात आले.

यावेळी प्रतिष्ठानच्या सदस्यांनी पेण शहर व तालुक्यातून ७ टन १११ किलो निर्माल्य गोळा करण्यात आले. या साठी पेण शहर व तालुक्यातील वाशी नाका ,वाशी, रावे, वरवणे, वरसई, सापोली, धावटे, आंबिवली, जिते, हनुमान पाडा,दादर,शिर्की, वडखळ,भाल या गावाच्या अंतर्गत येणारे बैठकांतील ८७७ श्री सदस्य सहभागी झाले होते.या गोळा केलेल्या निर्माल्य पासून सेंद्रीय खत तयार करण्यात येणार आहे.







## आजचे राशि भविष्य



**मेष**

तुम्ही जे ध्येय साध्य करण्याचा प्रयत्न करत आहात ते आज साध्य होऊ शकते. काम कितीही कठीण असले तरी एकाग्रता टिकवून ठेवावी लागेल.

**वृषभ**

व्यवसायात आज तुम्हाला फायदा होईल. तुम्हाला कोणाची तरी मदत घ्यावी लागेल. तसेच, आज तुम्हाला वादविवादांपासून दूर राहावे लागेल.

**मिथुन**

विरोधक तुमचे नुकसान करण्याचा अयशस्वी प्रयत्न करतील. या राशीचे लोक जे सरकारी सेवेत आहेत त्यांना काही उत्कृष्ट असाइनमेंट मिळू शकते.

**कर्क**

नवीन कामाचा विचार करण्याची पूर्ण संधी मिळू शकते.. विद्यार्थ्यांना यश मिळण्याची शक्यता आहे, परंतु अभ्यासात अजून मेहनत करावी लागेल.

**सिंह**

ऑफिसमध्ये नवीन प्रोजेक्ट मिळेल, ज्या पूर्ण करण्यासाठी सहकाऱ्यांची मदत मिळेल. मुलांकडून आनंद मिळेल. दिवस चांगला जाईल.

**कन्या**

तुमच्या कामावर लक्ष केंद्रित करू शकाल. वैयक्तिक समस्या सुटल्यानंतर मानसिक शांती मिळेल. कामाच्या ठिकाणी काम चांगले होईल.

**तूळ**

कोणतेही नियोजित काम पूर्ण होईल. काम वेळेवर आणि सहजतेने पूर्ण होण्यास मदत होईल. विद्यार्थ्यांसाठी दिवस चांगला जाणार आहे

**वृश्चिक**

आज तुम्हाला तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत चांगला वेळ घालवायला मिळेल, ज्यामुळे कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील.

**धनु**

व्यावसायिक संपर्क मजबूत करण्याचा प्रयत्न कराल आणि एखाद्या महत्त्वाच्या व्यक्तीशी किंवा राजकारणी व्यक्तीशी भेटणे फायदेशीर ठरेल.

**मकर**

काही कामात मदत लागेल, या बाबतीत तुम्हाला एखाद्या चांगल्या मित्राचा सल्ला मिळेल. महत्त्वाची कामे सकारात्मक दृष्टिकोनाने पूर्ण करता येतील.

**कुंभ**

कामाला नवीन स्वरूप देण्यासाठी काही सर्जनशील क्रियाकलापांमध्ये देखील रस असेल. स्पर्धेशी संबंधित कार्यात यश मिळू शकते.

**मीन**

अधिका-यांसोबतच्या व्यवहारात थोडे सावध राहावे. आर्थिक लाभाचे नवीन स्रोत दिसू शकतात. कौटुंबिक कामासाठी प्रवास करावा लागू शकतो.

नियमित वाचा दैं. ठाणे जीवनदीप वार्ता

# छत्रपती शिवाजी महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा कार्यक्रमाचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासन अधिक गतिमान, लोकाभिमुख व कार्यक्षम होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी जन्मदिनी दि.17 सप्टेंबर 2025 ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती दि.02 ऑक्टोबर, 2025 या कालावधीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत "सेवा पंधरवडा" साजरा करण्यात येणार आहे.

"सेवा पंधरवडा" च्या पहिल्या टप्प्यात दि. 17 सप्टेंबर ते दि.22 सप्टेंबर 2025 या कालावधीत पाणंद रस्ते मोहिम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेत अतिक्रमीत शिव व पाणंद रस्त्याचे सीमांकन व मोजणी करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ता उपलब्ध करुन देणे, अतिक्रमित रस्ता असल्यास अतिक्रमणे दूर करणे, रस्त्याच्या नोंदी महसूल अभिलेखात घेणे, इत्यादी उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सद्य:स्थितीत गाव नकाशावर असलेले रस्ते व वहिवाटीचे रस्ते ग्राम महसूल अधिकारी, मंडळ अधिकारी, व स्थानिक पदाधिकारी यांच्यामार्फत शिवार फेरीव्दारे रस्त्याची पाहणी करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. या निमित्ताने सर्व शेतकरी बांधवांनी शेतावर पाहाणी करतेवेळी ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) यांच्या सोबत सहभाग नोंदवावा. तसेच शेतरस्त्याच्या वादाबाबत काही समस्या असल्यास दि.19 सप्टेंबर 2025 रोजी आयोजित केलेल्या रस्ता अदालतीमध्ये सहभाग घ्यावा.

महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली शेत रस्त्यासंदर्भात अत्यंत महत्त्वकांक्षी असे अभियान दि. 17 सप्टेंबर ते दि.22 सप्टेंबर 2025 या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. शेत रस्ता हा शेतक-याच्या दृष्टीने शेती विकासाच्या बाबतीत अत्यंत महत्वाचा घटक असल्याने या अभियानात सर्व शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन तालुका प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.

# संकल्प रायगड जिल्हा प्रशासनाचा
## सेवा पंधरवडा जनतेच्या सेवेचा

**मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे आणि रायगड-अलिबाग (अ.का)**

आपल्या दैनंदिन जीवनात महसूल विभागाशी संबंधित अनेक कामे असतात. कधी शेतजमिनीची नोंद, कधी घराचा उतारा, तर कधी सरकारी योजनेचा लाभ... ही कामे वेळेत आणि पारदर्शकपणे व्हावीत यासाठी रायगड जिल्हा प्रशासनाने एक महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेतली आहे. 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत' राबवण्यात येणारा हा "सेवा पंधरवडा" सामान्य जनतेला दिलासा देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आला आहे.

भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आगामी वाढदिवसापासून (17 सप्टेंबर, 2025) राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (02 ऑक्टोबर, 2025) हा 'सेवा पंधरवडा' राज्यभर साजरा होणार आहे. या कालावधीत, सर्वसामान्य जनतेच्या जिव्हाळयाच्या समस्या सोडवण्यासाठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि गतिमान पद्धतीने काम करणार आहे. या उपक्रमात राबवले जाणारे कार्यक्रम यापूर्वीही सुरू होते, परंतु या काळात ते युद्धपातळीवर आणि मोहीम स्वरूपात राबविले जातील.

यासंदर्भात शासनाने नुकताच एक निर्णय काढला असून, तो www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर संकेताक २०२५०९०११०५७१५१६१९ या क्रमांकावर उपलब्ध आहे.

या अभियानाचे स्वरूप तीन टप्प्यांमध्ये विभागले आहे:

*** पहिला टप्पा: पाणंद रस्त्यांची मोहीम**
**(17 ते 22 सप्टेंबर)**

शेतकऱ्यांसाठी शेतापर्यंत पोहोचणारे रस्ते (पाणंद/शिवरस्ते) अत्यंत महत्त्वाचे असतात. अनेकदा रस्ते नसल्यामुळे किंवा ते खराब असल्यामुळे शेतकऱ्यांना आपला शेतमाल घेऊन जाण्यासाठी अडचणी येतात. या काळात जिल्हा प्रशासन खालील गोष्टींवर विशेष लक्ष देणार आहे.

**रस्त्यांचे सर्वेक्षण आणि नोंदणी:** ज्या पाणंद रस्त्यांची नोंद अजूनही शासकीय दप्तरात (निस्तार पत्रक व वाजिब उल अर्ज) झालेली नाही, त्यांची नोंद घेतली जाईल. महसूल विभागाच्या शासन निर्णय क्र. लवेसू-२०२५-प्र.क्र.४५८ /भूमापन (ल-१), दि.२९.०८.२०२५ नुसार, पाणंद रस्त्यांना क्रमांक देण्याची प्रभावी अंमलबजावणी केली जाईल.

**नकाशावर चिन्हांकित करणे:** अमरावती जिल्ह्यात राबवलेल्या यशस्वी प्रकल्पाच्या धर्तीवर, पाणंद रस्ते गाव नकाशावर चिन्हांकित केले जातील.

**रस्ते अदालत:** शेताच्या रस्त्यांमुळे होणारे वाद मिटवण्यासाठी आणि प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी खास 'रस्ता अदालत' आयोजित केली जाईल. तसेच, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्रे घेतली जातील.

*** दुसरा टप्पा: 'सर्वांसाठी घरे' उपक्रम**
**(23 ते 27 सप्टेंबर)**

प्रत्येकाला स्वतःचे घर मिळावे, या उद्देशाने 'सर्वांसाठी घरे' हा उपक्रम राबवण्यात येत आहे. या काळात, जिल्हा प्रशासन खालील शासन निर्णयांची अंमलबजावणी करेल:

(ग्रामविकास विभाग, निर्णय दि.16.02.2018), (नगर विकास विभाग, निर्णय दि. 17.11.2018), आणि (महसूल विभाग, शासन निर्णय दि. 14.12.1998 व दि. 01.08.2015)

**पट्टे वाटप मोहीम:** घरे बांधण्यासाठी उपलब्ध असलेल्या शासकीय जमिनी गरजू व पात्र लाभार्थ्यांना कब्जेहक्काने दिल्या जातील. तसेच, रहिवासी प्रयोजनासाठी असलेल्या शासकीय जमिनींवरील अतिक्रमणे नियमानुसार नियमित केली जातील.

अतिक्रमणांचे नियमितीकरण: महसूल विभागाच्या १४.१२.१९९८ च्या निर्णयानुसार, शहरातील जमिनीवरील गायरान नोंदी कमी करून, अतिक्रमणे नियमानुकूल केली जातील.

*** तिसरा टप्पा:नावीन्यपूर्ण उपक्रम**
**(28 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर)**

या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी स्थानिक परिस्थिती आणि गरजा लक्षात घेऊन काही नवीन उपक्रम राबवतील. यामध्ये नागरिकांच्या अडचणी दूर करणाऱ्या वेगवेगळ्या योजनांचा समावेश असेल.

हे अभियान यशस्वी करण्यासाठी विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार त्यांच्या स्तरावर सर्व संबंधित यंत्रणांसोबत बैठका घेऊन कामाचे नियोजन करतील. तसेच, या अभियानात स्थानिक आमदार, खासदार, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य आणि ग्रामपंचायत सदस्य यांनाही सहभागी करून घेतले जाईल. या अभियानामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येईल.

या 'सेवा पंधरवड्या'ला यशस्वी करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व सन्माननीय लोकप्रतिनिधी, शासकीय यंत्रणा आणि नागरिकांनी देखील उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

# 'स्वच्छ हवेसाठी सर्व यंत्रणांना हवा नागरिकांचा सक्रिय सहभाग'
## अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांचे प्रतिपादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : वायू प्रदूषण कमी होऊन हवेची गुणवत्ता सुधारावी यासाठी महापालिकेसह विविध यंत्रणा प्रयत्नशील असतात. नागरिकांनीही त्या प्रयत्नांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. म्हणजे सगळयांच्या योगदानातून हवा स्वच्छ राखणे शक्य येईल, असे प्रतिपादन ठाणे महापालिकेच्या प्रदूषण नियंत्रण विभागाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत अतिरिक्त आयुक्त संदीप माळवी यांनी केले.

घरच्या घरी कचऱ्याचे नियोजन करणे, सार्वजनिक वाहनांचा वापर करणे, झाडे लावणे व त्यांची काळजी घेणे अशा गोष्टींमधून सर्वसामान्य नागरिक आपापल्या परीने हवेची गुणवत्ता सुधारण्याच्या प्रयत्नात मदत करू शकतात. कोणतेही अभियान जेव्हा नागरिकांमार्फत पुढे नेले जाते तेव्हाच त्याला यश मिळते, असेही अतिरिक्त आयुक्त माळवी यांनी स्पष्ट केले. तसेच, ठाणे महानगरपालिकेतर्फे महाविद्यालय व शाळा यांच्यामध्ये माझी वसुंधरा अंतर्गत इ प्रतिज्ञा आणि त्यांची पूर्तता या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार असल्याची घोषणा यावेळी त्यांनी केली. जास्तीत जास्त प्रतिज्ञांची नोंदणी करणाऱ्या महाविद्यालयांना सन्मानित करण्यात येणार आहे. त्याची सविस्तर माहिती लवकरच माहिती पर्यावरण विभागातर्फे देण्यात येईल, असेही ते म्हणाले.

मानवी आरोग्याचे रक्षण करण्यासाठी वायू प्रदूषण कमी करण्यासह हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणखी प्रयत्न करण्याची गरज आहे. त्यासाठी दरवर्षी आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिवस साजरा केला जातो. या वर्षी या दिवसाची संकल्पना, रेसिंग फॉर एअर म्हणजेच स्वच्छ हवेसाठी कृती आणि सामूहिक प्रयत्तांना गती ही आहे. त्यासाठी महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार महापालिका अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, स्वयंसेवी संस्था आणि विद्यार्थी यांच्यासाठी कार्यशाळेच्या आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली. तसेच, राज्याच्या कृती आराखड्यानुसार ठाणे महापालिका क्षेत्रासाठीही कृती आराखडा तयार करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृह येथे झालेल्या या कार्यशाळेत राज्य हवामान कृती कक्षाचे संचालक अभिजीत घोरपडे यांनी नागरी क्षेत्रासाठी हवामान कृती आराखडा याबद्दल मार्गदर्शन केले. नागरी भागातील आव्हाने आणि त्यांचा सामना करण्यासाठी योजण्यात आलेल्या उपायांची माहिती त्यांनी दिली. ठाणे महापालिकेने तयार केलेल्या उष्णता कृती आराखड्याचेही त्यांनी कौतुक केले.


तसेच, नागरी विभागातील हवा प्रदूषण नियंत्रणासाठी रस्त्यांची स्थिती, वाहतूक व्यवस्थापन, बांधकामांचे नियोजन आदी उपाययोजना आवश्यक असल्याचे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ठाणे विभागाचे उप प्रादेशिक अधिकारी संजीव रेडासनी यांनी सांगितले. महावितरण कंपनीतील कार्यकारी अभियंता अविनाश रणदिवे आणि सहाय्यक अभियंता किशोर सावरकर यांनी सौर उर्जेचा वापर वाढवण्याची आवश्यकता सांगितली. ठाण्यात १००० सोसायट्यांनी प्रधानमंत्री सर्यघर योजनेत सौर पॅनल बसविल्याचेही त्यांनी सांगितले.

तर, सोमय्या महाविद्यालयातील पर्यावरण विभाग प्रमुख डॉ. निलेश वाघ यांनी नागरी सहभागाचे महत्त्व विशद केले. त्याचबरोबर, ठाणे महापालिकेच्या उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत यांनी महापालिकेतर्फे हवा प्रदूषण रोखण्यासाठी केल्या जात असलेल्या उपायांची माहिती दिली.

या कार्यशाळेस, उपायुक्त (उद्यान, पर्यावरण) मधुकर बोडके, उपायुक्त (शिक्षण) सचिन सांगळे, उपनगर अभियंता गुणवंत झांब्रे आणि शुभांगी केसवानी आदी उपस्थित होते.

या कार्यशाळेत, विविध पर्यावरणपूरक स्पर्धेत पारितोषिके मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कचऱ्यापासून कला निर्मिती या गटात अर्थव पवार, रुचिता पांचाळ, विराट काटे, निविदा पगार यांना पारितोषिक मिळाले. शाडू मातीपासून मूर्ती बनवण्याच्या गटात निविदा पगार, विहान सपकाळ, रुचिता पांचाळ यांना पारितोषिक मिळाले. तर, बीज गोळे निर्मिती स्पर्धेत कृतिका घोलप, आदित्य चाकोले, निर्मला राठोड यांना पारितोषिक मिळाले. तसेच, कागदी लगद्यापासून मूर्ती बनविण्याच्या स्पर्धेत संघपाल कांबळे, रिया खरात, सिद्धेश चव्हाण यांना पारितोषिक मिळाले. या सर्व विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते पर्यावरण दूत म्हणून गौरव करण्यात आला.

# शारदा संगीत विद्यालयाचे अध्यक्ष सुरेश नारंग यांचे निधन




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : वांद्रे येथील शारदा संगीत विद्यालयाचे अध्यक्ष सुरेश नारंग यांचे नुकतेच निधन झाले. ते ८१ वर्षांचे होते. पंडिता इंदिराबाई राजाराम केळकर व राजाराम वासुदेव केळकर यांनी पाहिलेले शारदा संगीत विद्यालयाचे स्वप्न सुरेश नारंग यांनी प्रत्यक्ष साकार केले. या विद्यालयाच्या उभारणीसाह कलेच्या प्रचार प्रसारासाठी त्यांनी आयुष्य समर्पित केले. विविध क्षेत्रातील मान्यवरांसह शारदा संगीत विद्यालयातील सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी सुरेश नारंग यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन घेतले. त्यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी शुक्रवारी, १२ सप्टेंबर रोजी खार पश्चिमेकडील खटवारी दरबार, लिंकिंग रोड येथे सायंकाळी ५:०० वाजता प्रार्थना सभेचे आयोजन केले होते.

# कांद्याचे भांडवल मिळणे कठीण ; शेतकऱ्यांचे भविष्य अंधारात
## (तातडीने दरवाढ हवी सरकारकडे अर्थ हाक)

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ओतूर : रब्बी हंगामात इतर पिकांपेक्षा कांद्यामुळे काही आर्थिक आधार मिळेल अशी अपेक्षा असलेल्या ओतूर व परिसरातील शेतकऱ्यांसमोर आता मोठे संकट उभे ठाकले आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची आवक वाढली असली तरी भाव अत्यंत कमी असल्याने उत्पादक हवालदिल झाले आहेत. उत्पादन खर्चही निघेनासा झाल्याने अनेक शेतकरी निराशेच्या गर्तेत सापडले आहेत. सध्या कांद्याला केवळ २ ते १२ रुपये किलो दर मिळत असल्याने ही परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे.



गेल्या तीन महिन्यांपासून दर सातत्याने उतरते राहिल्याने शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंता स्पष्ट दिसून येते. चांगल्या प्रतीचा कांदा असूनही बाजारात त्याला योग्य दर मिळत नसल्याने अनेकांना आर्थिक तोटा सहन करावा लागत आहे. काही शेतकरी पुढील हंगामासाठी लागणारे भांडवल जमवण्यासाठी चाळीत साठवलेला कांदा कमी दराने विक्री करून हात आखडता घेत आहेत. त्यातही योग्य किंमत न मिळाल्याने तोटा वाढत आहे.

शेतकरी सांगतात की एका एकरावर ८० हजार ते १ लाख रुपयांपर्यंत भांडवल गुंतवूनही शेवटी ३० ते ४० हजार रुपये तोटा सहन करावा लागत आहे. त्यात उत्पादन खर्च, मजुरी, वाहतूक आणि इतर खर्चांचा विचार केला तर परिस्थिती अधिक बिकट होते.


रब्बी हंगामातील इतर पिकांपेक्षा कांदा हे उत्पन्न देणारे पीक मानले जात होते. परंतु दर वाढण्याऐवजी सतत कमी होत असल्याने पुढील हंगामाची लागवड करावी की नाही या संभ्रमात शेतकरी सापडले आहेत. "काय उपयोग एवढा खर्च करून शेती करण्याचा? पुढील महिन्यात लागवड करावी की नाही याचा निर्णय घेणे कठीण झाले आहे," असे एका शेतकऱ्याने सांगितले. शेतकऱ्यांना कांद्याला योग्य दर मिळावा यासाठी अनेकांनी बाजार समिती व प्रशासनाकडे आर्थ हाक दिली आहे कांद्याला दरवाढ मिळाली नाही तर शेती टिकवणे अशक्य होईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. तसेच काही शेतकरी पुढील हंगामासाठी बियाणे, खत आणि इतर खर्चासाठी कर्जाचा आधार घेण्यासही तयार असले तरी सततचे आर्थिक नुकसान आणि अनिश्चित दर यामुळे त्यांचा आत्मविश्वास डळमळीत झाला आहे.

**पुढील हंगामाचा मोठा प्रश्न:**

सध्या अनेक शेतकरी पुढील महिन्यात होणाऱ्या लागवडीसाठी भांडवल कसे उभारावे, कर्ज घेणे योग्य ठरेल का, याबाबत संभ्रमात आहेत. काहीजण लागवड पुढे ढकलण्याचा विचार करत आहेत, तर काहीजण कोणत्याही परिस्थितीत शेती सोडायची नाही अशी भूमिका घेत आहेत.

शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की, "कांद्याला किमान उत्पादन खर्च तरी मिळाला पाहिजे. अन्यथा शेती बंद करण्याची वेळ येईल." बाजार समिती व शासनाने लवकर निर्णय घेऊन शेतकऱ्यांना सोयाबीन कापसाप्रमाणे हमीभाव द्या व कांद्याला किलोला १५ रुपये प्रमाणे अनुदान देऊन मदत करावी अशी मागणी जोर धरत आहे.

# एमआयडीसी परिसरात भटक्या कुत्र्या मांजरांसाठी अँटी रेबीज लसीकरण मोहीम



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रोटरी क्लब ऑफ डोंबिवली मिडटाऊन यांच्यातर्फे डोंबिवली परिसरात 7 ते 13 सप्टेंबर या कालावधीत भटक्या कुत्र्या मांजरासाठी मोफत अँटी -रेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे. या उपक्रमात व्हेटरिनरी प्रॅक्टिशनर्स वेलफेअर असोसिएशन, केडीएमसी, भटके कुत्रे प्राणी प्रेमी, रॉयल कॉलेज, प्रगती कॉलेज व एमकेएम पटेल कॉलेजचे एनएसएस विद्यार्थी, पशुवैद्यक विद्यार्थी, मिलापनगर रेसिडेन्स वेलफेअर असोसिएशन आणि रोटरी सदस्य यांनी सहभाग नोंदवीला आहे.

आज शुक्रवारी एमआयडीसी निवासी, रिजेन्सी अनंतम परिसरात ही खास मोहीम दिवसभर राबविण्यात आली होती. या आजच्या मोहिमेत एकूण 243 भटके कुत्रे आणि 27 मांजरी यांना मोफत अँटी रेबीज लसीकरण देण्यात आले. शिवाय मागील पाच दिवसांत 1267 भटके कुत्रे व 48 मांजरी यांना अँटी-रेबीज लसीकरण करण्यात आले होते. 13 सप्टेंबर रोजी रिजेन्सी इस्टेट आणि ग्रामीण परिसर येथे अँटी-रेबीज लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत पशुवैद्यक डॉ. मनोहर अकोले, मिलापनगर रेसिडेन्स वेलफेअर असोसिएशनचा अध्यक्षा वर्षा महाडिक, रोटरी क्लब मिडटाऊनचे अध्यक्ष अनिल हिरावत, किशोर आढाळकर, जितेंद्र नेमाडे, संतोष शृंगारपुरे, मिलापनगरचे राजू नलावडे, अरुण जोशी, प्राणीमित्र रोनक सांगोई, अजय मालवणकर यांच्यासह अनेक प्राणीमित्र, विद्यार्थी हे उपस्थित होते. प्राणीमित्र रोनक सांगोई व अजय मालवणकर यांनी या मोहिमेसाठी विशेष मेहनत घेतली.

# जीवनदीप महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाचा उद्बोधन कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

गोवेली : समाजाची निस्वार्थपणे सेवा करण्यासाठी उभा झालेला एक विभाग अर्थात राष्ट्रीय सेवा योजना विभाग! जीवनदीप महाविद्यालयामध्ये सदर विभाग अधिक सक्रियतेने कार्य करत असून नवनवीन समाज उपयोगी कार्यक्रम राबवत असतो.२०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये या विभागात सक्रिय झालेल्या नवीन विद्यार्थ्यांसाठी दिनांक ११-०९- २०२५ रोजी या विभागाच्या मार्फत उद्बोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सेवा योजना विभागाची माहिती



तसेच विभागाच्या मार्फत केले जाणारे विविध कार्यक्रम, शिबिर यांची माहिती देण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे यांनी विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे सचिव.मा.सौ.स्मिता घोडविंदे, संचालक. मा. प्रशांत घोडविंदे , डायरेक्ट डॉ.के.बी.कोरे तसेच सर्व प्राध्यापक यांचे सहकार्य या कार्यक्रमाला लाभले. राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यकारी अधिकारी प्रा. दिनेश धनगर, NSS चे लीडर ,स्वयंसेवक सदर कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा.धनश्री नाईक यांनी केले तसेच आभार प्रदर्शन प्रा. दिनेश धनगर यांनी केले. सर्वांच्या सहकार्याने सदर कार्यक्रम उत्तम रीतीने पार पडला.

# कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्पातील नादुरुस्त ठिकाणांची तत्काळ दुरूस्ती होणार
## कंत्राटदार स्वखर्चाने करणार दुरुस्ती

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : कोपरी-ठाणे (पूर्व) खाडीलगत विकसित करण्यात आलेल्या कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्पात काही ठिकाणी तत्काळ दुरुस्तीची आवश्यकता असून ती कामे कंत्राटदार स्वखर्चाने करणार आहे. तसे निर्देश कंत्राटदारास दिल्याचे ठाणे स्मार्ट सिटीचे सीईओ संदीप माळवी यांनी स्पष्ट केले आहे.

कोपरी वॉटरफ्रंट प्रकल्पाचा लोकार्पण सोहळा मार्च-२०२३ मध्ये झाला. येथे मोठया प्रमाणात नागरीकांची वर्दळ असून सुविधांचा वापर नागरीकांकडून सातत्याने सुरू आहे. या ठिकाणी विविध सण व महोत्सव स्थानिक रहिवाशांमार्फत मोठ्या प्रमाणात साजरे केले जातात. या प्रकल्पांतर्गत २५० मी लांबीचा जॉगिंग ट्रॅक, मुलांसाठी खेळण्याकरीता व्यवस्था व खुली व्यायाम शाळा, कोळी संस्कृती दर्शविणारी शिल्पे, प्रसाधन गृह, ॲम्पी थिएटर, सभा मंडप, विसर्जन घाट चौक, रस्ता व पदपथ. जेट्टीकडील रस्ता, उद्यान कामे व वृक्ष लागवड, सुरक्षा रक्षक कक्ष, सीसीटीव्ही नेटवर्क व विद्युत कामे कामे करण्यात आली.

येथील ॲम्पी थिएटरच्या स्टेजला तडे गेले असून आसनांची मोडतोड व तोफांचा चौथरा उखडला असल्याबाबत तक्रारी आल्या आहेत. त्यानुसार स्मार्ट सिटीच्या अधिकाऱ्यांनी या प्रकल्पाची प्रत्यक्ष पाहणी केली. ॲम्पी थिएटरच्या मागील बाजूच्या भिंतीच्या गिलाव्याला भेगा पडल्याचे निदर्शनास आले. तसेच, तोफांकरिता एकूण ६ दगडी चौथरे बांधण्यात आले असून त्यापैकी एका चौथऱ्याचे काही दगड निखळले आहेत. त्याचबरोबर, गझिबोतोल काही लाकडी आसन मोडकळीस आली आहेत. या सर्व गोष्टींची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश संबंधित कंत्राटदारास देण्यात आले आहेत. या प्रकल्पातील कामांचा दोषदायित्व कालावधी जरी संपुष्टात आलेला असला तरीही ही सर्व दुरुस्तीची कामे संबंधित कंत्राटदाराकडून त्याच्याच खर्चाने करून घेण्यात येणार आहेत.



# मानवसेवा सामाजिक संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : आमदार किसन कथोरे यांच्या वाढदिवसानिमित्त मानवसेवा सामाजिक संस्था, मुरबाड (संस्थापक अध्यक्ष सुरेश नारायण बांगर) यांच्या वतीने मुरबाड शहरातील न्यू इंग्लिश स्कूल मधील इयत्ता 5 ते 12 विच्या आदिवासी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना वह्या, पेन, पुस्तके यांसारखे आवश्यक साहित्य देण्यात आले. शिक्षण हेच उज्वल भविष्यासाठीचे शस्त्र असल्याने ग्रामीण व आदिवासी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या कार्याचे कौतुक करत अशा उपक्रमांमुळे समाजात शैक्षणिक जागर निर्माण होईल, असा विश्वास व्यक्त केला.यावेळी मानवसेवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुरेश बांगर, न्यू इंग्लिश स्कूलचे प्राचार्य राकेश पाडवी, उपप्राचार्य जयवंत कराळे,श्री बडगुजर सर, निकम सर, सोनावणे सर, भाजपा युवा कार्यकर्ते नरेश मोरे, शिंदे मॅडम, पठारे मॅडम, मोहपे मॅडम , खापरे मॅडम, पत्रकार दिलीप पवार, शंकर करडे, संजय बोरगे,चेतन पोतदार व शाळेय विद्यार्थी उपस्थित होते.



# श्री गजानन विद्यालयात विज्ञान प्रदर्शनाला प्रतिसाद



## मुलांनी मोबाईलचा वापर कमी करू पुस्तके वाचन करावे - डॉ. सुरेखा इटकर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : विज्ञान म्हणजे कुतूहल, यातूनच प्रश्न निर्माण होतात आणि विविध शोध लागतात. यासाठी मुलांनी मोबाईल चा वापर कमी करून पुस्तके वाचन करावे आणि योग्य आहारातून शरीर मन सुदृढ ठेवावे असा मोलाचा सल्ला डॉ. सुरेखा इटकर यांनी विद्यार्थ्यांना दिला. कल्याण मधील श्री गजानन विद्यालयात आयोजित विज्ञान प्रदर्शनात प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना हा सल्ला दिला.

श्री गजानन विद्याप्रसारक मंडळ संस्थेचे संस्थापक सदस्य कै. प्रभाकर भालेराव यांच्या जयंती निमित्त दरवर्षी श्री गजानन विद्यालय येथे विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यंदा ही शाळेत १० सप्टेंबर रोजी विज्ञान प्रदर्शन आयोजित केले होते. या कार्यक्रमाला डॉ. सुरेख इटकर प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. संस्थेचे सदस्य सुश्रुत भालेराव, आस्मा क्रिएशनच्या अश्विनी भालेराव हे यावेळी उपस्थित होते. तसेच सुप्रिया जोशी आणि श्री मंजुळे हे परीक्षक म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरस्वती पूजनाने झाले. कै दादा भालेरावांच्या शिल्पाकृतीस पुष्पहार अर्पण करून त्यांना वंदन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचे सुरेख स्वागतगीतातून स्वागत करण्यात आले. इयत्ता ८ वी, ९ वी च्या विद्यार्थिनींनी सुमधूर विज्ञान गीत सादर केले. यानंतर प्रमुख अतिथी सुरेखा इटकर, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कांचन भालेराव, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका कल्पना पाटील, जेष्ठ शिक्षिका वंदना शिंदे तसेच परीक्षक सुप्रिया जोशी, निलम पाटणकर, राखी गंगुर्दे आणि श्री मंजुळे यांनी सर्व विज्ञान प्रकल्पांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले आणि त्यांना मार्गदर्शन केले.

# नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान : लाखो नागरिकांना मिळणार नवदृष्टीचा लाभ

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर पासून 'नमो नेत्र संजीवनी आरोग्य अभियान' महाराष्ट्रभर राबविले जाणार आहे. महात्मा गांधी यांच्या जयंती दिनी २ ऑक्टोबर पर्यंत चालणाऱ्या या उपक्रमात दहा लाखाहून अधिक नागरिकांची मोफत नेत्र तपासणी, शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येणार आहेत.

या विशेष मोहिमेतून मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर रुग्णांना मोफत चष्मेवाटप केले जाणार असून काचबिंदूसह इतर नेत्रविकारांवरील निदान, सल्ला आणि उपचार देखील मोफत केले जाणार आहेत.

### जिल्हा व तालुका स्तरावर शिबिरे

राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये, तालुका व गावपातळीवर नेत्र तपासणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. गाव, वस्ती, तांडे, पाडे यांसह दुर्गम भागातील नागरिकांना या शिबिरांचा थेट लाभ होईल. शस्त्रक्रियेची गरज असलेल्या रुग्णांना जिल्हा रुग्णालये व संलग्न वैद्यकीय संस्थांकडे पाठवून संपूर्ण मोफत शस्त्रक्रिया व औषधोपचार करण्यात येतील.

### उपक्रमातील संस्थांचा व्यापक सहभाग

या अभियानात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, सार्वजनिक आरोग्य विभाग, महानगरपालिका, वैद्यकीय शिक्षण विभाग, नगरपालिका, इंडियन मेडिकल असोसिएशन, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, धर्मादाय रुग्णालये, महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, ईएसआयसी रुग्णालये तसेच खासगी नेत्र रुग्णालये व विविध सामाजिक संस्था या उपक्रमामध्ये सहभागी होणार आहेत. या सर्व संस्थांच्या संयुक्त प्रयत्नातून हा उपक्रम अधिक व्यापक आणि यशस्वी होणार आहे.

### तळागाळातील नागरिकांसाठी मोठा दिलासा

नेत्ररोग उपचाराचा खर्च गरीब नागरिकांच्या खिशाला परवडणारा नसतो. अशा परिस्थितीत ही मोफत शिबिरे गरजू व वंचित घटकांसाठी मोठा दिलासा ठरणार आहेत. विशेषतः ग्रामीण भागातील वृद्ध, शेतकरी, मजूर, महिला व ज्येष्ठ नागरिकांना नवदृष्टी मिळण्याचा मार्ग या उपक्रमातून खुला होणार आहे.

या उपक्रमाचा लाभ तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशातूनच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला जात आहे. प्रत्येक गरजू नागरिकांपर्यंत पोहचण्याकरिता सर्व शासकीय यंत्रणा प्रयत्न करत आहे. यामुळे लाखो रूग्णांवर मोफत नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रियेसह औषधोपचार केले जाणार आहेत. या शिबिराचा लाभ राज्यातील गरजू रूग्णांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

# आंबिवली येथील प्रस्तावित सिमेंट ग्राइडिंग युनिटबाबत मी कल्याणकर सामाजिक संस्थेने घेतली हरकत

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आंबिवली येथील प्रस्तावित सिमेंट ग्राइडिंग युनिटबाबत मी कल्याणकर सामाजिक संस्थेने हरकत घेतली असून संस्थेचे अध्यक्ष तथा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी नगरसेवक नितीन निकम यांनी याबाबत कल्याणच्या महाराष्ट्र प्रदूषण नियत्रंण मंडळात उप प्रादेशिक अधिकारी यांच्याकडे हरकत नोंदवली आहे.

कल्याण डोबिंवली महानगर पालिका, उल्हासनगर महानगर पालिका, भिवंडी-निजामपूरा महानगर पालिका, ठाणे महानगर पालिका व एम.आय.डी.सी. परीसरातील सुमारे ६०/७० लाख नागरीकांना पिण्याचे शुध्द पाणी मिळावे म्हणून उल्हारा नदी प्रदूषण मुक्त व्हावी याकरीता नितीन निकम हे मागील १० वर्षापासून पाठपुरावा करीत असून सुमारे ४८ दिवस आमरण उपोषण, धरणे, उपोषण, पाण्याविना पाण्यात उपोषण आदी केली आहेत. शासनाकडून प्रत्येकवेळी लेखी तोंडी आश्वासीत करण्यात आलेले आहे.

उल्हास नदीमधील पाणी इतके प्रदूषीद आहे की त्यामधील पाणी मनुष्य जिवनास पिण्यायोग्य नाही असा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचा अहवाल देखील आहे. असे असतांना कल्याण डोबिंवली महानगर पालिका क्षेत्रामधील मौजे मोहने, अटाळी व आंबिवली या ठिकाणी पूर्वीच्या एन.आर.सि. कंपनीच्या जागेमध्ये अबिवली सिमेंट ग्राइडिंग यूनिट सुरु करण्यासाठी मे. पी. ॲन्ड एम सोल्यूशन, उत्तरप्रदेश या पर्यावरण सल्लागारामार्फत ई.सी. मिळणेकामी ई.आय.ए. मसूदयासह प्रदूषण नियंत्रण कार्यालयाकडे अर्ज दाखल केला आहे.

याबाबत शनिवारी जाहिर लोक पर्यावरण विषयक जनसुनावाणीचे आयोजन केले आहे तसेच लेखी स्वरुपात सूचना देखील मागविल्या आहेत. या प्रस्तावित प्रकल्पाला मी कल्याणकर सामाजिक संस्थेने काही मुद्द्यांबाबत आक्षेप घेतला असून यामध्ये या जनसुनावणीबाबत स्थानिक रहिवाश्यांना पूर्णपणे कल्पना न देणे, या प्रकल्पा पासून उल्हास नदी व काळू नदी अगदी जवळ असून या नदीतील पाण्याचा ठाणे जिल्ह्यातील ५०/६० लाख लोकांना पिण्याचा पाण्याचा पूरवठा केला जातो. या सह इतर आक्षेपांचा विचार करुन प्रस्तावित प्रकल्पाला ई.सि. देण्यात येवू नये अशी मागणी संस्थेने केली आहे.

# पेणमध्ये साखरचौथ गणेशोत्सव विसर्जन सोहळा संपन्न

## कुंभार आळीच्या राजाची थाटात मिरवणूक



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : गणेशोत्सवानंतर पहिल्या संकष्टी चतुर्थीच्या दिवशी साजरा करण्यात येणाऱ्या साखरचौथ गणेशोत्सवातील दीड दिवसांच्या गणेशमूर्तींची मिरवणूक पेणमध्ये मोठ्या उत्साहात संपन्न झाली. यावेळी पेणचे आकर्षण समजल्या जाणाऱ्या मल्हार रुपातील कुंभार आळीच्या राजाची भंडारा उधळत थाटात मिरवणूक काढण्यात आली. तर पेणमधील इतर बाप्पांच्या मिरवणुका देखील उत्साहात काढण्यात आल्या होत्या.

रायगड जिल्ह्यातील पेण, अलिबाग, उरण, पनवेल सारख्या ठिकाणी साखरचौथ गणेशोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो. त्यातच पेण शहरात याची जास्त क्रेझ पहायला मिळते. पेण तालुक्यातील हजारो तरुण गणेश मूर्तीकार वर्षभर गणपती मूर्ती बनवण्यात व्यस्त असल्याने गणेशोत्सव काळात त्यांना बाप्पाची मनोभावे हवी तशी पूजाअर्चा करता येत नाही. त्यामुळे पेणमध्ये अनंत चतुर्दशीपेक्षा साखरचौथ गणेशोत्सवाला अधिक महत्व दिले जाते. या गणेशोत्सवातील विसर्जनाच्या मिरवणुका विशेष आकर्षण ठरत असतात. यावर्षी श्री गणेश मित्र मंडळ कुंभार आळीच्या माध्यमातून जेजुरीच्या खंडेरायाची प्रतिकृती साकारून बाप्पाची भंडारा उधळत विसर्जन मिरवणूक काढण्यात आली. यावेळी मिरवणूक मार्गावर सर्वत्र भंडाऱ्याची उधळण झालेली दिसत होती. तर गुरव आळी मित्र मंडळाच्या माध्यमातून अघोरी कृत्याच्या खेळाचे सादरीकरण करण्यात आले. त्याचप्रमाणे यावेळी अष्टविनायक मित्र मंडळ, ओरिजनल अष्टविनायक मित्र मंडळ,कोंडाळ तलाव, नरदास चाळ प्रेम नगरचा राजा यांसह अनेक सार्वजनिक आणि खाजगी बाप्पांचे विसर्जन देखील करण्यात आले. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पेण पोलिसांनी चोख बंदोबस्त तैनात केला होता. आनंदी वातावरणामध्ये बाप्पाला निरोप देण्यात आला.

# भिवंडीत बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी शहर परिसरात बोगस डॉक्टरांचा सुळसुळाट झाला असुन भिवंडीतील झोपडपट्टी व कामगार वस्ती विभागातील गरीब व अशिक्षित नागरिकांच्या असहायतेचा फायदा घेत अनेक झोला छाप डॉक्टर कोणतीही वैद्यकीय पदवी नसताना वैद्यकीय उपचार करणारे दवाखाने थाटून बसले आहेत.याबाबत महापालिका आयुक्त प्रशासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्याने पालिका आयुक्त अनमोल सागर यांनी बोगस डॉक्टरांवर कारवाईचे निर्देश वैद्यकीय विभागास दिले होते.त्यामुळे बोगस डॉक्टरांवर कारवाई करणाऱ्या पथकाचे नियंत्रण अधिकारी डॉ जयवंत धुळे यांच्या मार्गदर्शन शहरातील शांतीनगर परिसरात वैद्यकीय पथकाने पंच व पोलिस पथका सह केलेल्या कारवाईत तीन बोगस डॉक्टरां विरोधात कारवाई केली आहे. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार देताच पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पालिका प्रशासनाने दिलेली माहिती अशी कि पालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राजकुमार शर्मा,डॉ. प्रिया फडके,डॉ.शोएब अंन्सारी आदि कर्मचाऱ्यांनी मिळालेल्या माहितीनुसार शांतीनगर पोलिसांना सोबत घेऊन गुरुवारी सायंकाळी सात ते रात्री दहा वाजता नागांव परिसरातील केलेल्या कारवाईत ज्योत्स्ना नगर येथील भक्तीसागर बिल्डींग येथे असलेल्या दवाखान्यात भिमराव ग्यानबा कावडे यांचे कडील वैद्यकीय प्रमाणपत्र तपासले असता त्यांनी एन.ई.एच.एन.या पदवीचे सर्टिफिकेट दाखवले. त्यामध्ये या पदवीधारक व्यक्ती ग्रामिण भागामध्ये नॅचरोपॅथी,योगा व ॲक्युपंक्चर इत्यादी पध्दतीचे उपचार देऊ शकतात,त्यांना शहरी भागात कुठल्याही प्रकारे ॲलोपॅथी औषधे व उपचार पध्दतीचा अवलंब करण्याची परवानगी नसताना कावडे वैद्यकीय व्यवसाय करीत होते.त्यांच्या क्लिनिकची पंचा समक्ष झडती घेतली असता त्यांचे ताब्यात खालीलप्रमाणे अनेक ऍलोपॅथीचे वैद्यकिय उपकरणे व औषधे मिळुन आली.त्यानंतर शांतीनगर परिसरातील आझाद नगर येथील सिध्दीकी क्लिनिक या मोहम्मद शमीम सिध्दीकी यांच्या दवाखान्यावर कारवाई केली. त्यांच्याकडे बी.ई.एम.एस.या पदवीचे प्रमाणपत्र आढळून आले.त्यांनी ही वरील प्रमाणे शहरी भागात परवानगी नसताना ॲलोपॅथीचे उपचार करण्यासाठी वैद्यकिय उपकरणे व औषधे बाळगून असल्याचे आढळून आले.

तर तिसरी कारवाई गायत्रीनगर परिसरातील नूरी नगर डोंगरपाडा येथे करण्यात आली.तेथे एका गाळ्यात मोहम्मद अयुब मोहम्मद हानीफ ही व्यक्ती दवाखाना थाटून बसली होती.त्याच्या कडे वैद्यकीय प्रमाणपत्रांची मागणी केली असता त्याच्याकडे कोणत्याही प्रकारचे वैद्यकीय प्रमाणपत्र नसताना तो अवैधरीत्या वैदयकीय व्यवसाय करीत असतांना आढळून आला.त्याठिकाणहून सुध्दा मोठ्या प्रमाणावर ॲलोपॅथीचे वैद्यकिय उपकरणे व औषधे जप्त करण्यात आली आहेत.तिन्ही ठिकाणांहून सुमारे आठ हजार ९९२ रुपयांची उपकरणे व औषधे यांचा साठा जप्त करीत डॉ राजकुमार शर्मा यांनी दिलेल्या तक्रारीनंतर शांतीनगर पोलिस ठाण्यात भिमराव कावडे,मोहम्मद शमीम सिध्दीकी,मोहम्मद अयुब मोहम्मद हानीफ या तिघांविरोधात कोणतेही वैद्यकीय प्रमाणपत्र नसताना ॲलोपॅथीचे वैद्यकिय व्यवसायीक असल्याचे नागरीकांना भासवुन त्यांची दिशाभूल व फसवणूक करून नागरीकां वर उपचार करीत असल्याने महाराष्ट्र प्रॅक्टीशनर ॲक्ट १९६१ चे कलम ३३,३६ व भारतीय न्याय सहिंता कलम ३१८(४) अन्वये फिर्याद दिल्याने गुन्हा नोंदवण्यात आला आहे.महापालिकेच्या धडक कारवाई नंतर भिवंडीतील झोला छाप बोगस डॉक्टरां मध्ये खळबळ उडाली असून अनेकांनी आपली दवाखाने दुकानदारी बंद ठेवून पळ काढला आहे.

# 'सत्याग्रहाची १२० वर्षे आणि महात्मा गांधी' विषयावर बिर्ला कॉलेजमध्ये कार्यशाळा संपन्न

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : बी.के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण येथील विद्यापीठ अनुदान आयोगाच्या अनुदानीत गांधी अभ्यास केंद्र आणि मुंबई सर्वोदय मंडळ यांनी 'सत्याग्रहाची १२० वर्षे आणि महात्मा गांधी' या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी उद्धाटक म्हणून मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती (सेवा निवृत्त) सत्यरंजन धर्माधिकारी आणि महाविद्यालयाचे संचालक डॉ. नरेश चंद्र उपस्थित होते.

न्यायमूर्ती धर्माधिकारी यांनी महात्मा गांधी आणि आचार्य विनोबा भावे यांच्या तत्वांबद्दल आणि त्यांच्या जीवनातील अनेक घटनांबद्दल सांगितले आणि आजच्या तरुण पिढीला विचारशील होण्यास सांगितले. आजच्या तरुण पिढीच्या आक्रमक होत चाललेल्या वर्तनाबद्दल चिंता व्यक्त करताना ते म्हणाले की, आज केवळ भारतच जगाला शांतीचा मार्ग दाखवू शकतो कारण त्यात महात्मा गांधीं सारख्या महापुरुषांची तत्वे आहेत. डॉ. नरेश चंद्र यांनी जगात वाढत्या अतिरेकीपणाच्या युगात



आपल्या वर्तनात गांधीजींची तत्वे बिंबवण्याबद्दल सांगितले.

प्राचार्य डॉ. अविनाश पाटील यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले आणि शेजारील देशांमधील अस्थिरतेकडे लक्ष वेधत सांगितले की, गांधीजींचे विचार आजच्या काळासाठी सर्वात समर्पक आहेत. कार्यक्रमाचे संचालन डॉ. श्यामसुंदर पांडे यांनी केले, डॉ. अर्चना सिंह यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला आणि डॉ. धीरज शेखावत यांनी सर्वांचे आभार मानले.

१२० वर्षांपूर्वी ११ सप्टेंबर रोजी महात्मा गांधींनी दक्षिण आफ्रिकेत पहिल्यांदाच सत्याग्रहाचा वापर केला. या वर्षी, महाविद्यालयाच्या गांधी अभ्यास केंद्राच्या स्थापनेला २० वर्षे पूर्ण होत आहेत. ११ सप्टेंबर हा संत विनोबा भावे यांचा जन्मदिवस देखील आहे. या गोष्टी लक्षात घेऊन, या कार्यशाळेत मुंबई सर्वोदय मंडळाचे व्यवस्थापक प्रा. हुबनाथ पांडे, लेखक रमन मिश्र, गांधीवादी विचारवंत अनूप कुमार आणि वरिष्ठ पत्रकार नवीन पांडे यांसारख्या विद्वानांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या इतर सत्रांचे संचालन डॉ. दिनेश वानुले आणि डॉ. नारायण तोटेवाड यांनी केले. हा कार्यक्रम उपप्राचार्य डॉ. महादेव यादव, डॉ. हरीश दुबे आणि गांधी अभ्यास केंद्राचे इतर प्राध्यापक आणि सदस्य विद्यार्थ्यांच्या विशेष सहकार्याने पूर्ण झाला. बिर्ला महाविद्यालयासोबत, आर.के.टी. कॉलेज, के.जे. सोमय्या कॉलेज, आर.एन. रुईया कॉलेज, स्वयंसिद्धी कॉलेज, भिवंडी आणि एस.एन. टी. विश्वविद्यालय आणि मुंबई विश्वविद्यालय यांची इतर महाविद्यालयांमधील दोनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) — कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) — कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) — कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) — कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) — कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ▪ नवी मुंबई ▪ ठाणे ▪ पालघर ▪ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

# पेण येथील अमृत मेळाव्याला मोठ्या संख्येने उपस्थित राहा - ॲड. मंगेश नेने

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील पेण येथे पहिला अमृत मेळाव्याचे आयोजन पेण एज्युकेशन सोसायटीच्या भाऊसाहेब नेने महाविद्यालयातील सभागृहात पेण जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी, अमृत महाराष्ट्र शासनाची स्वायत्तता संस्था आयोजित खुल्या प्रवर्गातील ब्राह्मण, गुजराती , मारवाडी, सिंधी, कच्ची, पाटीदार, राजपूत आधी प्रवर्गासाठी अमृत मेळाव्याचे आयोजन दिनांक १४ सप्टेंबर रोजी भाऊसाहेब नेने महाविद्यालय सभागृह पेण एज्युकेशन सोसायटी पेन जिल्हा रायगड येथे आयोजित करण्यात आले आहे.

सदर मेळाव्याचे प्रमुख पाहुणे



व वक्ते ॲड श्री बापूसाहेब नेने, बँक ऑफ इंडिया पेण ब्रांच मॅनेजर सौरभ पंनशीकर हे प्रमुख पाहुणे व वक्ते उपस्थित राहणार असून पेण एज्युकेशन सोसायटी अध्यक्ष ॲड. मंगेश नेने ९९७५००७६०० तसेच मराठी अमृत रायगड जिल्हा व्यवस्थापक शैलेश विनायक ९११२२२७८५९, अमित सामंत कोकण विभाग व्यवस्थापक ८२७५४५५४६५, महेश हेलवाडे पेण ब्राह्मण सभा ९७६४९०३५९८ त्यांच्याशी संपर्क साधून आपली उपस्थिती अमृत मेळावा साठी करावी. या मेळाव्यामध्ये व्यवसाय उद्योग शैक्षणिक कर्ज लाभयोजना इत्यादीची माहिती व मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचे मंगेश नेने यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. मोठ्या संख्येने अमृत मेळाव्यासाठी उपस्थित राहण्यासाठी वरील दिलेल्या नंबर वर संपर्क साधून उपस्थित राहण्याचे आवाहन केले आहे.

Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024